# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

**फोन नं.(०२०) २६०५०६४१**

**ई-मेल आयडी :-** comscea.pune@maharashtra.gov.in secscea.pune@maharashtra.gov.in

जा.क्र.रासनिप्रा/अधिकार-कर्मचारीरजापरवानगी/२०१४    ५८२    दिनांक : २४/११/२०१४

## परिपत्रक

**विषय : राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूकीच्या अनुषंगाने निवडणूक कामकाजाशी संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांच्या बदली/दीर्घ कालीन रजेबाबत...**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, म.रा.पुणे यांचे कडून राज्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्याचे कामकाज सुरू करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने सर्व संबंधीत जिल्हा / तालुका / प्रभाग निवडणूक अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांचे वैधानिक अधिकारक्षेत्रातील सहकारी संस्थांच्या निवडणूका घेणेबाबतचे आदेशही निर्गमीत करण्यात आलेले आहेत.

राज्यातील निवडणूकीस पात्र सहकारी संस्थांच्या निवडणूका विहीत मुदतीत घेण्याचे बंधन राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर आहे. सबब आपल्या कार्यालयातील निवडणूक कामकाजाशी संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांची कोणत्याही प्रकारची बदली/ दीर्घ रजा या पुढे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे परवानगी शिवाय मंजूर करू नयेत. अन्यथा निवडणूकीशी संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांचे बदली/ गैरहजेरीमुळे निवडणूकीच्या कामकाजात व्यत्यय/अडथळा/दिरंगाई निर्माण झाल्यास याबाबत संबंधीतांच्या बदली/रजा मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्यास जबाबदार धरण्यात येऊन महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील नियम ३(१) मध्ये नमूद तरतुदीनुसार ते कारवाईस पात्र राहतील याची नोंद घेण्यात यावी.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण यांचे मान्यतेनुसार.**

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, सर्व (प्रशासन/लेखापरिक्षण)
२. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सर्व
३. जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, सर्व

प्रत माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव :

१. तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी , सर्व

प्रत माहितीस्तव सविनय रवाना :

१.मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२.मा.साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे,साखर संकुल शिवाजीनगर, पुणे-५

३.मा.संचालक, हातमाग यंत्रमाग व वस्त्रोद्योग, म.रा.,नागपूर

४.मा.आयुक्त आदिवासी विकास, आदिवासी भवन, म.रा.नाशिक

५.मा.आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास, म.रा.मुंबई, वरळी सी फेस, मुंबई-१८

६.मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, ५ वा मजला, बाद्रा पूर्व, मुंबई-५१

७.कार्यकारी संचालक, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, एम.एम.आर.डी.ए.इमारत, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स बांद्रा (पूर्व) मुंबई-५१

८.मा.आयुक्त, मत्स्यालय, म.रा.मुंबई तारापोरवाला अ्र क्वीरिया, चर्नी रोड, मुंबई

९.अधिक्षक अभियंता लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे / सोलापूर

१०.मा.पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे

२/- त्यांना विनंती करण्यात येते की, कृपया उपरोक्त बाब आपले सर्व क्षेत्रिय कार्यालयाचे निदर्शनास आणून देण्यात यावी, व वरील सूचनांचे उल्ल्ंघन होणार नाही या बाबत आपले स्तरावरून कडक सूचना निर्गमीत करण्यात याव्यात.

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे